# बृहन्मुंबई महानगरपालिका
## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग
## पावसाळी परिस्थितीचा अहवाल
### १० सप्टेंबर ते ११ सप्टेंबर २०१९ सकाळी ८.०० ते ८.०० (२४ तास)

१. पाऊस:

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | १० सप्टेंबर २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१९ पावसाची टक्केवारी | १० सप्टेंबर २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१८ पावसाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | ९.० | २३५२.८ | २२०३ | १०६.८०% | १७३२.६ | ७७.५६% |
| सांताक्रुझ | ६.५ | ३३५१.६ | २५१४ | १३३.३२% | २२०२.४ | ८७.५७% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस:

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | १० सप्टेंबर २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३५८) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | ४.५५ | २५०९.५८ | ११३.९२% | १२४.४०% |
| पूर्व उपनगरे | ७.३३ | ३२७६.९७ | १२५.१०% | |
| पश्चिम उपनगरे | ६.७६ | ३०१३.२६ | | |

३. तापमान:

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २९.० | २३.५ |
| सांताक्रुझ | ३०.५ | २४.२ |

४. समुद्राची भरती:

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ११.०९.२०१९ | सकाळी १०:४६ | ३.८८ मी. | ११.०९.२०१९ | सायंकाळी ४:५९ | १.६४ मी. |
| ११.०९.२०१९ | रात्रौ १०:५० | ३.५२ मी. | १२.०९.२०१९ | पहाटे ४:३८ | १.०८ मी. |
| १२.०९.२०१९ | सकाळी ११:२० | ४.०० मी. | १२.०९.२०१९ | सायंकाळी ५:२५ | १.४७ मी. |

५. हवामान अंदाज: कुलाबा वेधशाळेने पुढील २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात पावसाच्या काही ठिकाणी तुरळक सरी पडत रहातील.

६. **पाणी साचणे : निरंक**

७. **घर/भिंत पडल्याच्या तक्रारी**: शहरात २, पूर्व उपनगरात २ व पश्चिम उपनगरात ३ अशा एकुण ७ ठिकाणी घर/भिंत पडल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधीत विभागांना व यंत्रणांस कळविण्यात आल्या आहेत. उपरोक्त तक्रारीपैकी पश्चिम उपनगरात : १) दिनांक १०.०९.२०१९ रोजी दुपारी १:३५ वा पोलिस नियंत्रण कक्षातून प्राप्त माहितीनुसार आरेन निवास, बुध्द गल्ली नं. २, गरीब नवाझ, वर्सोवा, अंधेरी (पू) येथे घराच्या सिलिंगचा काहिभाग कोसळून ३ व्यक्ती जखमी झाल्या. त्यांना बाहेर काढून उपचारार्थ कुपर रुग्णालयात पाठविण्यात आले. जखमींची नावे : १) पुनम पोतदार, वय १९ वर्षे, २) वर्षा पोतदार, वय २१ वर्षे या दोघांना किरकोळ मार असुन उपचार करुन सोडण्यात आले आणि ३) गिता पोतदार, वय ३५ वर्ष यानां रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

२)दिनांक १०.०९.२०१९ रोजी सायंकाळी ७:२२ वा अग्निशमन नियंत्रण कक्षातून प्राप्त माहितीनुसार लोटस इमारत, जवाहर नगर, रोड नं. १२, गोरेगांव (प) येथे घराच्या स्लॅबचा काहिभाग कोसळून २ व्यक्ती जखमी झाल्या. त्यांना बाहेर काढून उपचारार्थ ट्रॉमा केअर रुग्णालयात पाठविण्यात आले. जखमींची नावे : १) सुरेश दार्जी, वय ५९ वर्षे, २) प्रमिला दार्जी, वय ५० वर्षे या दोघांना किरकोळ मार असुन उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

३) शहरात : दिनांक १०.०९.२०१९ रोजी रात्रौ ९:१३ वा पोलिस नियंत्रण कक्षातून प्राप्त माहितीनुसार युसुफ इमारत, सीआयडी ब्रांच समोर, स्टार किंग हॉटेल, मोची फुट वेअर जवळ, क्रॉफर्ड मार्केट येथील तळमजला अधिक ३ असे बांधकाम असलेल्या इमारतीचा उत्तरेकडील अर्धा अधिक भाग पूर्णपणे कोसळला. अग्निशमन दलामार्फत अडकलेल्या १७ लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. सदर इमारत पूर्णपणे रिकामी करण्यात आली. विभागीय कामगारांमार्फत ढिगारा उचलण्याचे काम सुरु आहे.

८. **दरड कोसळणे**: निरंक

९. **शॉर्टसर्किट**: शहरात २, पूर्व उपनगरात १ व पश्चिम उपनगरात १ अशा एकुण ४ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधीत विभागांना व यंत्रणांस कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

१०. **झाडे/फांद्या पडण्याच्या नागरिकांकडून प्राप्त तक्रारी**: पश्चिम उपनगरात एकुण ४ ठिकाणी झाडे/फांद्या पडण्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधीत विभागांना व यंत्रणांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

११. **वाहतुक व्यवस्था : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)**

- **पश्चिम रेल्वे** : वाहतुक सुरळीत सुरु आहे.
- **मध्य रेल्वे** : वाहतुक सुरळीत सुरु आहे.
- **हार्बर रेल्वे** : वाहतुक सुरळीत सुरु आहे.
- **बीईएसटी** : वाहतूक सुरळीत सुरु आहे.

१२. **विशेष माहिती: निरंक**

====